महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय,
Assistant Commissioner of A.H., Taluka Mini Veterinary Polyclinic,
वसमत, जि.हिंगोली
Basmath, Dist.Hingoli
E-mail:-acahtmvpbasmath@gmail.com

जा.क्र.तालपसचि/निर्लेखण/90/2025, वसमत दिनांक: 03/04/2025

## जाहिर लिलाव

नादुरुस्त, निरुपयोग उपकरणे /साहित्य खरेदी करणाऱ्या ईच्छुक व्यक्ति/खरेदिदार यांना सुचना देण्यात येते की, तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, वसमत जिल्हा हिंगोली या कार्यालयांतर्गत निर्लेखित केलेली खालील प्रमाणे उपकरणे /साहित्याची जाहीर लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. सदर उपकरणे /साहित्य ईच्छुकांना ज्या स्थितीत आहेत त्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | वस्तु/साहित्याचे नाव | नग संख्या | अक्र | वस्तु/साहित्याचे नाव | नग संख्या |
|---|---|---|---|---|---|
| 1 | HP SI 2400 Scanner | 1 | 8 | Samsung mono Laser Printer | 1 |
| 2 | S Type chair with CR Sheat back and seat | 2 | 9 | Uniline Smartpower | 1 |
| 3 | Refridgerator 172 ltrs | 1 | 10 | Samsung Toner Cartridge | 1 |
| 4 | Air Cooler with metal body 5000 cum/hr | 1 | 11 | Kingston pendrive | 1 |
| 5 | Square Wave output Red DDC Voltage Invertor<br>Battery make Ecopower | 1<br>2 | 12 | Extention Metalic Board<br>AC power cable | 1<br>1 |
| 6 | Battery Stand | 1 | 13 | Digital camera Sony DSC | 1 |
| 7 | Computer NIC, Mouse USB, Scrolloptical, DVD Writer, 64 bit os, keyboard. | 1 | 14 | UPS- Iball | 2 |

त्याकरिता दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 11:00 वाजता तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, वसमत जिल्हा हिंगोली येथे जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/कंपनी/व्यापारी/व्यक्ति यांना नादुरुस्त, निरुपयोग उपकरणे /साहित्य खरेदी करावयाची असतील अश्या संस्था/कंपनी/व्यापारी/व्यक्ति यांनी जाहीर लिलावात भाग घ्यावा. भाग घेण्यास ईच्छुकांनी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि वसमत यांचे नावे रु. 1000/- (अक्षरी रुपये एक हजार केवळ) चा धनाकर्ष पेऐबल ॲक्ट/नगदी सादर करणे आवश्यक आहे. जाहीर लिलावात गठित समितीचा निर्णय अंतिम राहील. लिलावानंतर विक्री करावयाचे सर्व साहित्य चेपून मगच हस्तांतरित करण्यात येईल. जेणेकरून त्याचा पुनरवापर करणे शक्य होणार नाही.

(डॉ. अजय काशिनाथ मुस्तरे)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय,
वसमत जि.हिंगोली

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय,
Assistant Commissioner of A.H., Taluka Mini Veterinary Polyclinic,
वसमत, जि.हिंगोली
Basmath, Dist.Hingoli
E-mail:-acahtmvpbasmath@gmail.com

जा.क्र.तालपसचि/निर्लेखण/91/2025, वसमत दिनांक:03/04/2025

**तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, वसमत जिल्हा हिंगोली या कार्यालयातील भंडारातील निरुपयोग निर्लेखण झालेल्या उपकरणे /साहित्याचा लिलाव**

दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 11:00 वाजता

**अटी व शर्ती**

1. भाग घेणाऱ्यास अनामत रक्कम रु. 1000/- धनाकर्षच्या/नगदी स्वरूपात भरावी लागेल.
2. लिलावात सहभागी होणाऱ्या बोलीधारकाणे धनाकर्ष व इतर आनुषंगिक कागदपत्रे लिलावाच्या ठिकाणी सादर करण्याची वेळ दिनांक 15/04/2025 रोजी सकाळी 10:30 वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सहभागी होणाऱ्या बोलीधारकांचे धनादेश व इतर कागदपत्रे स्वीकारली जाणार नाहीत.
3. सदरची रक्कम अयशस्वी लिलावधारकास लिलाव पूर्ण होताच परत करण्यात येईल.
4. यशस्वी लिलावधारकास अनामत रक्कम लिलावाची रक्कम पूर्ण भरल्यानंतर परत करण्यात येईल.
5. लिलाव तीनवेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल. सर्व वस्तूंची मिळून बोली लावावी लागेल, विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलत येणार नाही.
6. लिलावामध्ये ज्या बोली धारकाची बोली सर्वाधिक असेल त्यांच्याच नावाने लिलाव तीन वेळा पुकारून लिलावास अंतिम मंजूरी देण्यात येईल.
7. अंतिम लिलाव ज्यांच्या नावे मंजूर होईल त्या व्यक्तीने लिलावाची संपूर्ण रक्कम सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि वसमत कार्यालयाच्या खालील बँक खात्यात RTGS अथवा धनाकर्षणे जमा करावी. पूर्ण रक्कम तबडतोब जमा न केल्यास त्या व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल. रक्कम भरावयाच्या खात्याचा तपशील खालील प्रमाणे

   **Name: ASST. COMM. OF ANIMAL HUSBANDRY, TMVP BASMATH**
   **Accont No.: 43319312206**
   **IFSC Code: SBIN0020017**
8. अंतिम लिलाव ज्याचे नावे मंजूर होईल त्यांनी लिलावतील संपूर्ण वस्तूची वाहतूक स्वत:चे वाहनाने त्याच दिवशी करावयाची आहे. या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे वाहन, हमाल, मदतनीस मिळणार नाही तसेच लिलाव अंतिम झालेल्या वेळेपासून मालाची प्रत्यक्ष वाहतूक करेपर्यंत लिलावाच्या वस्तूचे संरक्षण, बोलीधारकाणे स्वत: कारावयाची आहे. या कालावधीत लिलावातील कोणत्याही वस्तु गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.
9. लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तु चेपून टाकण्यात येतील व त्या वस्तु जश्या आहेत तशाच व यथास्थितीत घ्याव्या लागतील. लिलावाच्या वस्तु अगोदर पाहून घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.
10. लिलावात सहभागी होणा-याने स्वत:ची ओळख, त्याचा पत्ता या पुष्टयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील उदा. पॅनकार्ड, आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, वीजबील इ.
11. खरेदी दारांनी त्यांच्या पैनक्रमांक व टॅन क्रमांकाची प्रत सादर करावी.
12. एखादया व्यक्तीस दुसऱ्याच्या वतीने अथवा कंपनी तर्फे बोली बोलायची असेल तर बोली बोलणाऱ्या व्यक्तीने ठरावीक नमुन्यात अधिकारपत्र पॉवर ऑफ अरटर्णी दाखल करावी लागेल तरच बोली बोलता येईल. भागीदार असेल तर भागीदार पत्राची सांक्षाकीत प्रत दाखल करवी लागेल तरच त्यांना बोली बोलता योईल.

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकिय सर्वचिकीत्सालय,
Assistant Commissioner of A.H., Taluka Mini Veterinary Polyclinic
वसमत, जि.हिंगोली
Basmath, Dist.Hingoli
E-mail:-acahtmvpbasmath@gmail.com

13. लिलाव खरेदीदाराने विक्री किमतीचा भरणा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालपसचि वसमत यांच्या नावाने रोखीकृत होईल अशा तऱ्हेने काढावा. वरील शर्ती व अटींचा भंग केल्यास व शासनाची 1/4 व 3/4 रक्कम विहित मुदतीत न भरल्यास एकुण खरेदी किमतीवर 10 टक्के आयकर लावण्यात येईल.
14. सर्व बोलीधारकास पॅन कार्डची छायांकित सत्यप्रत (Self Attested) देणे अवश्यक आहे. पॅन कार्ड नसेल तर 20 टक्के आयकर आकारण्यात येईल याची नोंद घ्यावी.
15. लिलावची बोली रु. 100/- च्या पटीतच बोलावी लागेल. लिलावात सर्वात जास्त किंमतीची बोली समितीस मान्य असल्यास तिनदा बोलुन सदरची बोली निश्चित करण्यात येईल.
16. लिलाव मंजूर झाल्यानंतर सदर साहित्याची राखण करण्याची जबाबदारी लिलाव घेणाराची राहील.
17. नैसर्गिक आपत्ती व इतर कारणामुळे लिलाव झालेल्या साहित्यचे नुकसान झाल्यास विकत घेणारे/लिलाव घेणारे जबाबदार राहतील व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.
18. लिलावात अंतर्भुत साहित्याची मोजणी नोंदवही नुसार असून या मधे कमी/जास्त फरक असू शकतो. बोलीदाराने प्रत्यक्ष पाहणी करुन बोली बोलावी. साहित्याच्या तफावतीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
19. साहित्याच्या लिलाव पूर्ण झाल्यानंतर मालाची उचल/ने-आण इत्यादी संपूर्ण बाबी विहीत नियमानुसर व संबंधीत विभागच्या देखरेखी खाली करण्यची जबाबदारी बोली धारकाची राहील.
20. लिलावातील सर्व साहित्य घेऊन जाण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.
21. यशस्वी बोलीधारकाना आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 3 दिवसच्या आत सर्व साहित्याची उचलन/ने-आण इत्यादी संपुर्ण बाबी पुर्ण कराव्या लागतील.
22. यशस्वी बोलीधारकाने लावण्यात आलेल्या बोलीच्या रक्कमेपैकी 50% रक्कम त्याच दिवशी कार्यालयात जमा करावी व उर्वरीत रक्कम तीन दिवसाच्या आत कार्यालयात जमा करुन असलेल्या स्थितीत सदर साहित्य ताब्यात घ्यावे लागेल.
23. लिलावास अंतिम मंजूरी देणे अथवा लिलाव नाकारणे, स्थगीत करण्याचा किंवा लिलाव प्रक्रीया रद्द करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल तो सर्व बोलीधारकांस बंधनकारक राहील.
24. लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारची वाद उदभवल्यास याबाबतचा अंतिम निर्णय हा अध्यक्ष लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोलीधारकांस तो बंधनकारक राहिल.
25. वरील अटी व शर्ती मंजूर असणा-या खरेदीदारालाच लिलावात भाग घेता येईल.

लिलावाचे ठिकाण:- तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय, वसमत जिल्हा हिंगोली

(डॉ. अजय काशिनाथ मुस्तरे)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन,
तालुका लघुपशुवैद्यकिय सर्वचिकित्सालय,
वसमत जि.हिंगोली

Scanned with CamScanner